खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२–२३

### राष्ट्रीय क्रीडा दिन

पुढारी

# क्रीडा संस्कृती जोपासा : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा

बदललेल्या जीवनशैलीमुळे शारीरिक तंदुरुस्ती जोपासण्याची गरज सर्वच वयोगटांमध्ये निर्माण झाली आहे. त्यासाठी समाजात क्रीडाविषयक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक क्रीडा संस्कृती जोपासून समाजाचे प्रबोधन करण्याची आवश्यकता असल्याचे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी व्यक्त केले.



मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन करताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील व इतर मान्यवर.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सोमवारी (दि. २९) मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील बोलत होते. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. निशाद खांगटे, रवींद्र रोकडे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी ५ किलोमीटर तर विद्यार्थिनींसाठी ३ किलोमीटर अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय खेळाडूंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवताना जिद्द व सातत्य राखत उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील राहावे. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. होलेवाडी बायपास हायवेवर घेण्यात आलेल्या या मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक ऋतिक इंगळे, द्वितीय क्रमांक सौरभ मुळूक, तृतीय क्रमांक दत्ता मुळुक यांचा तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांक ऐश्वर्या खळदकर, द्वितीय क्रमांक वैष्णवी राळे, तृतीय क्रमांक कोमल सावंत यांनी पटकवला. या सर्वांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. चांडोलीच्या ग्रामीण आरोग्य रुग्णालयाच्या वतीने रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी, तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

My Gramin Edition
Aug 30, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# जीवनशैली बदलल्याने क्रीडा संस्कृती जोपासावी

## ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक क्रीडा संस्कृती जोपासून समाजाचे प्रबोधन करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित मॅरेथॉन स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. निशाद खांगटे, रवींद्र रोकडे उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी ५ कि.मी., तर विद्यार्थिनींसाठी ३ कि.मी. अशा दोन गटात झालेल्या या स्पर्धेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

बुट्टे पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय खेळाडूंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवताना जिद्द व सातत्य राखत उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील राहावे. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक ऋतिक इंगळे, द्वितीय क्रमांक सौरभ मुळूक, तृतीय क्रमांक दत्ता मुळूक यांनी, तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांक ऐश्वर्या खळदकर, द्वितीय क्रमांक वैष्णवी राळे, तृतीय क्रमांक कोमल सावंत यांनी पटकवला. या सर्वांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला.

Hello Pune Gramin
Page No. 6 Sep 02, 2022
Powered by: erelego.com

केसरी राष्ट्रीय ठेवा

पुणे, १२ सप्टेंबर २०२२ | २
@kesarinewspaper

# बदललेल्या जीवनशैलीमुळे शारीरिक तंदुरुस्ती जोपासण्याची गरज



राजगुरुनगर, (वार्ताहर) : बदललेल्या जीवनशैलीमुळे शारीरिक तंदुरुस्ती जोपासण्याची गरज सर्वच वयोगटांमध्ये निर्माण झाली असून त्यासाठी समाजात क्रीडाविषयक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक क्रीडा संस्कृती जोपासून समाजाचे प्रबोधन करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्यावतीने आयोजित मॅरेथॉन स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी बोलत होते.

बुट्टेपाटील पुढे म्हणाले, की विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय खेळाडूंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवताना जिद्द व सातत्य राखत उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील राहावे. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

होलेवाडी बायपास हायवेवर घेण्यात आलेल्या या मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक ऋतिक इंगळे, द्वितीय क्रमांक सौरभ मुळूक, तृतीय क्रमांक मुळुक दत्ता यांचा तर विद्यार्थिनींमध्ये प्रथम क्रमांक ऐश्वर्या खळदकर, द्वितीय क्रमांक वैष्णवी राळे, तृतीय क्रमांक कोमल सावंत यांनी पटकवला. या सर्वांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. चांडोलीच्या ग्रामीण आरोग्य रूग्णालयाच्या वतीने यावेळी रूग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ.एस.एस. पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. प्रा. व्ही. बी. दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. निशाद खांगटे, रवींद्र रोकडे उपस्थित होते.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**